JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# मानव विज्ञान शाखेतील उच्च शिक्षणामध्ये संशोधन आणि नवकल्पनांची भूमिका

**राहुल सपकाळ**
संशोधक
समाजशास्त्र विभाग
शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, अकोला

**सारांश** :

बदलत्या जगासोबत प्रत्येक क्षेत्रामध्ये होणारा मुलभूत बदल हा आश्चर्यकारक आणि लक्षणीय आहे. क्षेत्र कोणतेही असो त्यामध्ये होणाऱ्या बदलांचा स्विकार करुन गुणवता विकासासाठी संशोधन आणि नवकल्पना हया महत्वाच्या भूमिका पार पाडत आहेत. अभ्यासक्रमातील बदल, परीक्षा पध्दतीमधील बदल, अभ्यासक्रमांच्या कालावधीत वाढ, प्रभावी अध्ययन आणि अध्यापणासाठी विविध नवनवीन कौशल्ये, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, संशोधन पध्दतींचा योग्य प्रयोग इ.बाबी मानव विज्ञान शाखेतील उच्चशिक्षणामध्ये संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून अंबलबजावणी केल्यास सकारात्मक बदल अपेक्षित आहे. संशोधन आणि नवकल्पना हया उच्च शिक्षणामध्ये  कितपत प्रभावी ठरतात ? त्यांची भूमिका नेमकी काय ? हया प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी सदर शोधनिबंध हा प्रकाश टाकतो.

**मुख्यशब्द** (Keyword) : मानव विज्ञान शाखा, उच्च शिक्षण, संशोधन आणि नवकल्पना.

**प्रस्तावना** :

मानव विज्ञान शाखेमध्ये मानवी जीवनातील तात्वीक, जैविक, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक पैलुंचा अभ्यास केला जातो. मानव विज्ञानाचा उद्देश व्यापक अंत:विषय दृष्टीकोनातून मानवी जगाची समज वाढवणे आहे. यामध्ये इतिहास, तत्वज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र, न्याय अभ्यास, उत्क्रांती जीवशास्त्र, बायोकेमिस्ट्री, न्युरोसायन्स, लोकशास्त्र आणि मानवंशशास्त्र यासह अनेक क्षेत्रांचा समावेश आहे. मानव विज्ञानातील आधुनिक दृष्टीकोन मानवी संरचनेचे आकलन, त्याचे कार्य, सामाजीक समस्या, समस्यांची उकल इ.चा व्यापक शोध घेतल्या जातो.

संशोधन ही समस्या निराकरणाची सुव्यवस्थित प्रकिया आहे. मानवी मनाला अस्वस्थ करणाऱ्या बहुविध समस्यांच्या सप्रमाण व विश्वसनीय समाधानासाठी आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन व विश्लेषण करुन त्याचा अन्वयार्थ लावण्याची होय.

व्यक्तीला प्रतीत होणारी नवी कल्पना, कोणताही विचार, वर्तन किंवा गोष्ट, जी नवीन आहे आणि विदयमान स्वरुपापेक्षा, गुणात्मदृष्टया वेगळी आहे. उच्चशिक्षणामध्ये शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी अध्ययन-अध्यापन, पारंपारिक पद्धतीपेक्षा वेगळा, नाविण्यपूर्ण मार्ग वापरुन केलेला सर्जनशील उपक्रम राबविणे.

- **संशोधनाची उदिष्टे** :
  1) मानव विज्ञान शाखेतील उच्च शिक्षणामध्ये संशोधनाची भूमिका स्पष्ट करणे.
  2) मानव विज्ञान शाखेतील उच्च शिक्षणामध्ये नवकल्पनांचा अभ्यास करणे.
  3) उच्च शिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील घटकांचा अभ्यास करणे.
- **संशोधन पद्धती** :

  प्रस्तुत शोधनिबंधामध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. तसेच द्वितीयक तथ्य संकलन पद्धतीच्या आधारे शोधनिबंध पूर्ण करुन प्रकाशने, ग्रंथ, इंटनेट, वृत्तपत्रातील लेख, नियतकालिके, इ.चा उपयोग सदर शोधनिबंधामध्ये केला आहे.

- **अध्यायन–अध्यापन पद्धती** :

  एकविसाव्या शतकातील आव्हाने, समस्या व गतिमानता व गरजा या बाबी लक्षात घेऊन विद्यार्थी घडविण्यासाठी शिकण्याच्या पद्धतींमध्ये बदल आवश्यक आहे. यासाठी नाविण्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा परिचय व त्यांचा अध्ययन–अध्यापनात वापर या संदर्भात काही महत्वपूर्ण अध्ययन-अध्यापन पद्धतींचा विचार करण्यात आला आहे. प्रत्येक संकल्पनेसाठी कृतियुक्त मांडणी गरजेची आहे. भविष्यात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विदयार्थ्यांना त्यांचा चिकित्सक विचार, सृजनात्मक विचार, सहयोग संवाद, आत्मविश्वास आणि संवेदना एकविसाव्या शतकातील कौशल्ये प्राप्त व्हावीत या अनुषंगाने त्यांच्या शिकण्यासाठीची तयारी करणे आवश्यक आहे. संशोधन आणि नवकल्पनेच्या उदिद्ष्टांची पूर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून आणि विदयार्थ्यांच्या घोकंपट्टीतून सुटका करण्याच्या दृष्टीने नावीन्यपूर्ण अध्यापनशास्त्र हा एक उत्कृष्ट मार्ग आहे. ज्ञान व आकलन या कौशल्यांवर भर देण्यापेक्षा उपयोजनात्मक विकास करणे, चांगले व्यक्तिमत्व घडवून एकविसाव्या शतकाच्या अनुषंगाने विदयार्थी स्वत: कसे शिकतील या प्रकारची अध्ययनास पूरक वातावरण निर्मिती करणे गरजेचे आहे.

- **सामाजिक शास्त्रे** :

  सामाजिक संकल्पना समजून घेण्यास मदत करण्यासाठी सामाजिक भूमिकांचे पुनरुज्जीवन किंवा सामाजिक संघर्षाचा अभ्यास करावा लागेल. सामाजिक संवाद किंवा सामाजिक समन्वयाच्या द्वारे सामाजिक कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांना सामाजिक समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचा विकास किंवा सामाजिक नियोजन.

- **उच्च शिक्षणात संशोधनाचे महत्व** :

  उच्च शिक्षणात क्रांती घडवून आणण्यासाठी संशोधन महत्वाचे आहे. कारण ते धोरणे आणि पध्दतींची माहिती देण्यास मदत करते त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता आणि विदयार्थ्यांचा एकूण अनुभव सुधारू शकतो. हे मानव विज्ञान शाखेत एखादया विशिष्ट क्षेत्रात किंवा शिस्तीत ज्ञान आणि समजून घेण्यास देखील मदत करते. विद्यार्थ्यांचे परिणाम सुधारु शकतील अशा धोरणे आणि पद्धतींसाठी पुरावा आधारित शिफारशी देऊन संशोधन उच्चशिक्षणातील निर्णय क्षमतेची माहिती देऊ शकते. संशोधनामूळे नवनवीन शोध आणि सुधारणेची गरज आणि संधी ओळखण्यात मदत होऊ शकते.

- **शाश्वततेसाठी शिक्षण आणि शिक्षणामध्ये परिवर्तन** :

  प्रगती आणि वाढीची विचारधारा, पाश्चात्य संस्कृतीत खोलवर रुजलेली, केवळ पृथ्वीच्या (सतत वाढीच्या नावाने) समर्थन देत नाही तर वेगळया आणि शाश्वत भविष्यातील दृष्टान्त आणि कथांच्या निर्मितीवर परिणाम करते. परिवर्तनशील शिक्षणामूळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गृहीतके आणि विश्वासावर गंभीरपणे विचार करण्यास आणि प्रश्न विचारण्यास उत्तेजित करुन या अंदाजे फायदा होऊ शकतो. अध्यापन संशोधन, कॅम्पस ऑपरेशन, समुदाय आणि स्टेकहोल्डर्सचा सहभाग यासारख्या विविध फंक्शन्सना जोडणारे संपूर्ण युनिव्हर्सिटी पद्धती, हे HEI मध्ये स्थिरता अंतर्भूत करण्यासाठी आवश्यक म्हणून सूचित केले गेले आहे. शैक्षणिक धोरणे आणि उच्चशिक्षणामध्ये परिवर्तन करण्याच्या उदेशाने उपक्रमांची अंमलबजावणी या दृष्टीकोनानुसार सर्व विद्यापीठांच्या सर्व कार्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. शाश्वत प्रकल्पामध्ये कॅम्पस ऑपरेशन्स देखील समाविष्ट केल्या पाहिजेत, कारण विद्यार्थ्यांना शिकवलेल्या संकल्पना प्रत्यक्षात लागू केल्या जात नाहीत हे लक्षात आल्यास ते प्रेरित होणार नाहीत. उच्च शिक्षणामध्ये विद्याशाखा आणि विद्यार्थी या दोघांसाठी शाश्वतता समाविष्ठ करण्यासाठी वैयक्तिक बांधिलकी आणि समन्वयात्मक कृतींचा विकास आवश्यक आहे. बदलांची आवश्यकता केवळ सामग्रीमध्येच नाही तर शिस्तबद्ध चिंतेच्या पलीकडे जाणाऱ्या पद्धती दृष्टिकोनामध्ये आहे याचा अर्थ पारंपारिक अध्यापनशास्त्रीय फॅकल्टी लर्निंग कम्युनिटिज द्वारे वर्धित केल्या जाऊ शकते.

प्रस्तुत शोधनिबंधामधून पुढील प्रकारचे निष्कर्ष निघालेले आहेत.

1) मानव विज्ञान शाखेतील उच्चशिक्षणामध्ये संशोधनाची भूमिका ही महत्वाची व दिशादर्शक ठरणारी आहे.
2) मानव विज्ञान शाखेतील उच्चशिक्षणामध्ये नवकल्पनांचा उपयोग केल्यास परिणामकारक अध्ययन होऊन विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशिलता, स्वयंअध्ययन, स्वयंप्रेरणा इ.गुण विकसित होतात.

   2020 मधील घटकांचा उपयोग उच्चशिक्षणामध्ये अवलंबिने सुरू झाले असून त्याचा सकारात्मक परिणाम होत आहे.

4) सदर शोधनिबंध हा गुणवत्तापूर्ण शिक्षण ध्येयांची परिपूर्ती करण्यासाठी भारताची असलेली बांधिलकी दर्शविण्यासाठी निश्चित महत्वाकांक्षी आहे तसेच शाश्वत विकास ध्येयांची जाणीव जागृती, शाश्वतविकास ध्येयांद्वारे मानवी हक्क

जीवनमान उंचावणे, लिंग समानता तसेच सर्व स्तरावरील असमानता दूर करुन जबाबदारी पूर्ण बांधिलकीचे ज्ञान, कौशल्ये, मूल्ये, स्वभाव विकसित करणे जेणे करुन प्रत्येक विद्यार्थी एक वैश्विक नागरिक बनेल.

- **संदर्भ ग्रंथ** :

1) बन्सिबिहारी पंडित, चव्हाण नूतन, परिणामकारक संशोधन, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, प्रथम आवृत्ती, जानेवारी 2017.
2) शिक्षक मार्गदर्शिका, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी 2024.
3) डॉ.रेणावीकर माधवी, संशोधन पद्धती, केसरी मुद्रणालय, पुणे, तिसरी आवृत्ती 2018.
4) डॉ.मायी सुनील, डायमंड पब्लिकेशन्स, पुनर्मुद्रण, ऑगस्ट 2013.
5) डॉ.बोधनकर सुनिल, प्रा.अलोणी विवेक, ङ कुळकर्णी मृणाल, सामाजिक संशोधन पद्धती, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर, नववी आवृत्ती 2021.
6) प्रा.पाटील महेंद्र, संशोधन पद्धती, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, प्रथम आवृत्ती, जूलै 2018.
7) http://www.researchgate.net

= * = * =